# 2021
# वार्षिक राशिभविष्य




Edit with WPS Office

# मेष

2021 ला तुमच्या ध्येयापर्यंत तुम्ही नक्कीच जाणार आहात. ग्रहांची साथ असतांना योग्य प्रकारे केलेले प्रयत्न तुम्हाला घवघवीत यश देणार. नोकरी मिळेल. असलेल्या नोकरीत अधिक उन्नती कराल. कोणत्याही प्रकारची कोर्ट केस असल्यास त्याचा पाठपुरावा करून ते संपवा. व्यवसायातील समस्या सोडवाल. कर्जाचे काम करून घेता येईल. परिचयातून नवे कंत्राट मिळण्याची जिद्द ठेवा. शेतकी विषयात नवे धोरण उपयोगी पडेल. जुने कर्ज फेडता येईल. राजकीय सामाजिक क्षेत्रात व्यापक स्वरूपाचे कार्य कराल. मान प्रतिष्ठा मिळेल. मनात ठरविलेले पद भूषविण्याची संधी मिळेल. कुटुंबातील ताण तणाव कमी होईल. अविवाहितांना चांगली स्थळे मिळतील. संतती प्राप्तीचा प्रयत्न करा. वाटाघाटीत फायदा होईल. नवीन वास्तू, दुकान, जमीन घेता विकता येईल. जानेवारी, फेब्रुवारी, एप्रिल ते जुलै या कालावधीत तुम्हाला प्रगतीची नवी संधी मिळेल. प्रसिद्धी पैसा मिळेल. मैत्री वाढेल. मार्च, ऑगस्टमध्ये व्यवहारात सावध राहा. फसगत टाळा. जून, सप्टेंबर मध्ये  वादाचा प्रसंग येईल. प्रवासात सावध राहा. तुमच्या बुद्धिमत्तेचा उपयोग इतरांना सुद्धा करून देता येईल. शिक्षण-कला-साहित्यात- चित्रपटात महत्व वाढेल. यश मिळेल. सल्ल्यासाठी भेटू शकता.

Edit with WPS Office

# वृषभ

मागील वर्षाच्या अनेक समस्या, अडचणी 2021 मध्ये दूर करून नव्या आत्मविश्वासाने नवे स्थान तुमच्या क्षेत्रात तुम्ही तयार करू शकाल. ग्रहांच्या साथीला प्रयत्नांची जोड दिल्यास अनेक कामे वेगाने पूर्ण करू शकाल व अधिक वेगाने तुमचे स्वप्न पूर्ण कराल. नोकरीत प्रभाव पडेल. नवीन नोकरी मिळेल. व्यवसायातील अडथळे कमी करून मोठे कंत्राट मिळवता येईल. परिचयात वाढ झाल्याने त्याचा उपयोग करून घ्या. शेतकरी वर्गाच्या अडचणी कमी होतील. मालाला चांगला भाव येईल. नवीन कल्पना कृषिक्षेत्रात वापरता येईल. कायद्याचे पालन प्रत्येक ठिकाणी योग्य प्रकारे करा. कोर्टाच्या संबंधी कामे होतील. प्रेम प्रकरणाला योग्य वळण देऊन संसार सुरू करता येईल. राजकीय-सामाजिक क्षेत्रात तुमच्याबद्दल झालेला गैरसमज दूर करून तुमचे स्थान अधिक भक्कम करू शकाल. चित्रपट कला साहित्यात नावलौकिक वाढेल. पैसा मिळेल. शेअर्समध्ये चांगल्या सल्ल्याचा उपयोग करून नवीन गुंतवणूक करता येईल. शिक्षणातील अपयश पुसून टाकता येईल. परीक्षेत यश मिळवाल. जानेवारी मार्च मध्ये नवीन ओळख होईल. कल्पनाशक्तीला प्रेरणा मिळेल. एप्रिल सप्टेंबर मध्ये तणाव होईल. जुलैमध्ये कठीण प्रसंगांवर विजय मिळवावा लागेल. जानेवारी मे जून-जुलैमध्ये प्रसिद्धी पैसा मिळेल. थोरामोठ्यांचा सहवास मिळेल. नवीन वास्तू, दुकान, जमीन या वर्षात खरेदी-विक्री करता येईल. एप्रिल ऑक्टोबर मध्ये सावधपणे निर्णय घ्या. जानेवारीला प्रवासात सावध राहा. सल्ला घेता येईल भेट ठरवा

Edit with WPS Office

# मिथुन

2021 मध्ये मनावर शरीरावर दडपण येईल. अडचणींचा रस्ता पार करून यश मिळवावे लागेल. जिद्द ठेवा. अहंकार नको. वेळेचा सदुपयोग करा. नुसते विचार करून कोणतेच ध्येय गाठता येणार नाही. त्यासाठी अविरत परिश्रमांची जोड द्यावी लागेल. खाण्यापिण्याचे तंत्र सांभाळा. व्यवसायात बेसावध राहू नका. मोठे काम मिळवून मोठा फायदा ह्या वर्षात होऊ शकतो. प्रसंगानुरूप तुम्हाला निर्णय घ्यावा लागेल. जास्त मोह न ठेवता काम करा. आजचे काम आजच करण्याचा प्रयत्न करा. नोकरीत कामाचा व्याप वाढेल. नोकरी टिकवा. जानेवारी, मे, सप्टेंबर मध्ये रागावर नियंत्रण ठेवा. प्रवासात वाहनाचा वेग कमी ठेवा. दुसऱ्यांनी केलेल्या चुका सुद्धा आपले नुकसान करतात तेव्हा चौफेर सावध राहा. या वर्षात पैसा येईल तसा खर्चही वाढेल. पोटाची काळजी घ्या. घरातील वृद्ध व्यक्तींची चिंता वाटेल. विरह होईल. कौटुंबिक वाटाघाटीत फायदा होईल. कायद्याला धरून सर्व कामे करा. कायदा पाळा म्हणजे अधिक समस्या येणार नाही. जानेवारी मेमध्ये नवीन परिचयाची नीट पारख करा. मगच कोणताही व्यवहार करा. मोह टाळा. वाकड्या वाटेने यश मिळेल असे समजू नका. शिक्षणात आळस नको. चित्रपट कला साहित्यात तडजोड स्वीकारावी लागेल. फेब्रुवारी मार्च एप्रिल जुलै-ऑगस्ट मध्ये प्रतिष्ठा मिळेल.

Edit with WPS Office

# कर्क

2021 तुम्हाला मागील वर्षापेक्षा बरे चांगले जाईल. अडचणी सोडवता येतील. जुना वाद मिटवून नवे संबंध जोडता येतील. इतरांना मदत करण्याचा तुमचा स्वभाव असल्याने तुम्ही कळकळीने मत प्रदर्शित करता. नोकरीमध्ये तुमच्या कामाचे कौतुक या वर्षात होईल. एप्रिल ते जून मध्ये कामाचा व्याप वाढेल. घरापासून दूर जाण्याची वेळ येईल. या कालावधीत प्रकृतीची काळजी घ्या. व्यवहारात फसगत टाळा. आपसात वाद-विवाद वाढू शकतो. फेब्रुवारीमध्ये वाहनापासून धोका होईल. काळजी घ्या. फेब्रुवारी-मार्चमध्ये वेगाने महत्त्वाची कामे करून घ्या. मान प्रतिष्ठा या काळात मिळेल. राजकीय-सामाजिक क्षेत्रात अधिकार मिळेल. जुन्या रेंगाळलेल्या कामांना पूर्ण करा. कुटुंबातील नाराजी दूर करता येईल. कोर्टाच्या कामाला या वर्षाचा पूर्वार्ध अधिक चांगला असेल. विद्यार्थी वर्गाला यश मिळवण्यासाठी धडपड करावी लागेल पण यश मिळेल. जानेवारी-मार्च दौऱ्यात यश मिळेल. जूनमध्ये आरोप येईल. एप्रिलमध्ये संतापजनक घटना घडेल. वास्तू, जमीन या या बाबतीत कामे मार्च पर्यंत करून घ्या. फेब्रुवारी मध्ये तुमच्या कामाचे कौतुक होईल. शेतकरी वर्गाला मागील वर्षापेक्षा 2021 चांगले ठरेल. चित्रपट कला साहित्यात मार्चमध्ये ओळखी होतील. जानेवारी फेब्रुवारी जून कुणाचाही अधीन जाऊ नका. ऑगस्ट ते सप्टेंबर यश मिळवाल. नव्या योजनेसाठी प्रयत्न करा.

Edit with WPS Office

# सिंह

2021 तुम्हाला संमिश्र स्वरूपाचे ठरेल. कसोटीचे ठरेल. गोड बोलणाऱ्या व्यक्ती पासून सावध राहा. मोहाला बळी पडू नका. हातात असलेले यश निसटु देऊ नका. जिद्द ठेवा. मेहनत घ्या. वेळ पडल्यास एखादी तडजोड करावी लागेल. विरोधक मैत्री करण्यास येतील. मित्र दुरावण्याची शक्यता आहे. नोकरी टिकवा. कामाचा व्याप वाढेल. जानेवारी-फेब्रुवारी तणाव होईल. मार्चमध्ये प्रकृतीची काळजी घ्या. दौऱ्यात सावध रहा. आर्थिक व्यवहार मार्च जूनमध्ये प्रलोभन देणारा असेल. अपरिचित व्यक्ति अथवा धंद्यात सावधपणे वागा. उतावळेपणा करु नका. जून-जुलै कामाचा व्याप वाढेल. कामात चूक करू नका. भलत्या मार्गाने जाऊन पैसा यश मिळवण्याची चूक करू नका. शिक्षणात मेहनत घेतल्यास पुढे जाता येईल. व्यसन नको. संगत चांगली ठेवा. राजकीय सामाजिक कार्यात किचकट प्रश्नावर काम करावे लागेल. आरोप येतील. टीका होईल. तुमचे पद डळमळीत करण्याचा प्रयत्न विरोधक करतील. जानेवारी जुन जुलैमध्ये प्रतिष्ठा धोक्यात येईल. कटकारस्थान केले जाईल. तुमचा संताप वाढेल. गुंता वाढेल. फेब्रुवारीत मैत्री करणारी व्यक्ती नीट पारखून घ्या. कौटुंबिक तणाव सहन करावा लागेल. शेजारच्यांबरोबर तटस्थ धोरण ठेवा. मौल्यवान वस्तू, कागदपत्रे सांभाळून ठेवा. एप्रिल-मे मध्ये चांगले काम कराल. प्रसिद्धी, पैसा मिळेल. चित्रपट कला साहित्य क्षेत्रात टिकून राहा. तुमच्या स्वभावाचा गैरवापर कोणी करणार नाही यावर लक्ष ठेवा. कोर्ट केस मध्ये नम्रता ठेवा. पैसा देऊन काम करून घेण्याचा मार्ग सोपा नाही.

Edit with WPS Office

# कन्या

2021 च्या सुरुवातीपासून रेंगाळलेली कामे करून घ्या. चुकलेला निर्णय सुधारून घेण्याचा प्रयत्न करा. तुमच्या क्षेत्रात प्रगतीची नवीन संधी तुम्हाला मिळेल. एप्रिल ते जुलै मध्ये अचानक अडचणी निर्माण होतील. विरोधक त्रस्त करतील. कोणतेही काम करताना उतावळेपणा करू नका. अति आत्मविश्वास धोकादायक ठरेल. मागील वर्षातील कोणतेही अपयश तुम्ही पुसून टाकण्याचा प्रयत्न करा. नोकरी, शिक्षण, धंद्यात नवा मार्ग मिळेल. तुमचा उत्साह वाढेल. कोर्टा संबंधी कामे करून घ्या. नोकरीत एप्रिल ऑगस्टमध्ये कायद्याला धरून कामे करा. वरिष्ठांचा दबाव सहन करावा लागेल. फेब्रुवारी एप्रिल जुलैमध्ये धंद्यात फसगत होईल. आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. गुंतवणूक विचारपूर्वक करा. शेतकरी वर्गाला संमिश्र स्वरूपाचे वर्ष असेल परंतु नवा मार्ग मिळेल. नवीन परिचय होतील. विचारांची देवाण-घेवाण झाल्याने उत्साह वाढेल. चित्रपट कला साहित्याला चांगले वळण मिळेल. कल्पनाशक्तीला चालना मिळेल. फेब्रुवारी एप्रिल मध्ये राजकीय सामाजिक क्षेत्रात विरुद्धलिंगी व्यक्तीकडून मनस्ताप होईल. मोहाला बळी पडू नका. अनाठायी खर्च होईल. व्यसनाने प्रतिष्ठा धोक्यात येऊ शकते. मुलांच्या संबंधित चांगली योजना होईल. त्यांच्याकडून प्रगतीची बातमी मिळेल. बुद्धिचातुर्य हेच उपयुक्त ठरेल. तुम्ही कठोर टीका केली तरी मनातून तुम्ही मैत्री तोडण्यास तयार नसता. शत्रुत्व तुम्हाला आवडत नाही. समाजकार्याची आवड तुम्हाला उत्साह देते. जीवनसाथीला खुश ठेवा. खरेदी कराल.

Edit with WPS Office

# तुला

2021 मध्ये तुमच्या क्षेत्रात तुम्हाला प्रगतीची संधी मिळेल परंतु अडथळ्यांची शर्यत मात्र त्यात असेल. तुमच्या स्वभावाबद्दल कार्याबद्दल गैरसमज पसरवण्याचे काम गुप्त शत्रू करतील. त्यामुळे तुम्ही स्वतः सावध राहा. नम्रपणे तुमचे मनोगत व्यक्त करा. नवीन व्यक्तीशी जास्त जवळीक करणे धोक्याचे ठरेल. कोणतेही काम करताना कायद्याच्या चौकटीचे उल्लंघन करू नका. कोर्टाची पायरी चढावी लागणार नाही याकडे पहा. इतरांनी केलेल्या चुका नोकरीत तुम्हाला दुरुस्त कराव्या लागतील. कामाचा व्याप जानेवारी-मार्च मध्ये वाढेल. तणाव होईल. नोकरी टिकवून ठेवा. अरेरावीची भाषा कुठेही ठेवू नका म्हणजे निभाव लागेल. धंद्यात गुंतवणूक करण्याची घाई करू नका. छोटा धंदा सुद्धा चालेल परंतु जास्त मोह ठेऊ नका. एप्रिल ते जुलै तुम्हाला किचकट कामे करून घेता येतील. कोर्टाच्या कामात यश मिळेल. मान प्रतिष्ठा मिळेल. रेंगाळलेला विवाह जमेल. संततीची प्राप्ती होईल. प्रयत्न करा. जानेवारी मध्ये गैरसमज होईल. शिक्षणात जिद्दीने यश खेचून आणता येईल. व्यसन नको. पोटाची काळजी घ्या. पैसा अनाठायी खर्च करू नका. भागीदारी टिकवणे कठीण वाटेल. राजकीय सामाजिक कार्यात तत्परता ठेवा. अहंकार नको. परिस्थिती पाहून निर्णय घ्या. फेब्रुवारीमध्ये वैर करू नका. मारामारी नको. बेकायदा वागणूक नको. जून-जुलै आत्मविश्वासात भर पडणारी घटना घडेल. चित्रपट कला साहित्यात प्रगती होईल. मैत्रीत तणाव होईल. नवे परिचय होतील परंतु खरा मित्र कोण हे मात्र तुम्हाला ओळखता आले पाहिजे. वस्तू नीट सांभाळा.

Edit with WPS Office

# वृश्चिक

मागील वर्षात तुम्ही कठीण कामे करून दाखविली आहेत. 2021 तुम्हाला अधिक चांगले जाणार आहे. रेंगाळलेली कामे या वर्षाच्या सुरुवातीला करून घ्या. विरोधकांना योग्य तो धडा शिकवता येईल. कोर्टात अडलेली प्रकरणे मार्गी लावा. तुमच्यातील कलागुणांचा विकास करण्यात यश मिळेल. नोकरीत किचकट कामे करून दाखवल्याने वरिष्ठ तुमची प्रशंसा करतील. बेकारांना काम मिळेल. धंद्यात सुधारणा करता येईल. मोठे कंत्राट मिळवाल. जुना व्यवहार पूर्ण करता येईल. कर्जाचे काम करून घेता येईल. कुटुंबात अधिक सौख्य प्राप्त करण्यात यश मिळेल. विवाहासाठी स्थळे येतील. संतती प्राप्ती चा प्रयत्न करा. घर, दुकान, जमीन खरेदी विक्री करण्यात फायदा होईल. राजकिय सामाजिक कार्यात तुमचे महत्त्व वाढेल. एप्रिल ऑक्टोबरमध्ये विरोधकांचे डावपेच चांगल्या प्रकारे ओळखा म्हणजे त्यावर उपाय शोधता येईल. सावधपणे कोणताही निर्णय या कालावधीत घ्या. मैत्रीत तणाव होईल. कुटुंबातील वाटाघाटीत तुम्हाला दूर ठेवण्याचा प्रयत्न होऊ शकतो. जानेवारी मार्च ऑगस्ट सप्टेंबर मध्ये तुमच्या कार्याचा विस्तार होईल. नाव लौकिकात भर पडेल. संबंध सुधारतील. आर्थिक व्यवहारात फायदा होईल. समोर येणाऱ्या व्यक्तीचा नीट अभ्यास करून ठेवा. पुढील काळासाठी त्याचा चांगला उपयोग करता येईल. चित्रपट कला साहित्यात नवीन कलाकृती तयार कराल. प्रेरणा मिळेल. पैसा मिळेल. शिक्षणात मागे राहू नका. मे जूनमध्ये चौफेर सावध रहा. 10 जानेवारी 1 फेब्रुवारी प्रवासात काळजी घ्या. खर्च वाढेल. मनस्ताप होईल. तुम्ही नवा मार्ग तयार कराल.

Edit with WPS Office

# धनु

मागील वर्ष तणावाचे संघर्षाचे गेले आहे. तुम्ही तरीही त्यातून योग्य प्रकारे वाटचाल केली आहे. साडेसाती चालू आहे. माणसाला अनेक प्रकारचे अनुभव साडेसातीत येत असतात. तुम्ही टिकवून ठेवलेली प्रतिष्ठा, यश या वर्षात म्हणजे 2021 ला अधिक वाढणार आहे. नवे पर्याय तुमच्याकडे येतील. अधिक वेगाने तुम्ही वाटचाल करू शकाल. विरोधकांना नमते घ्यावे लागेल. कायद्याच्या कक्षा मात्र लक्षात ठेवा, म्हणजे वेळ फुकट जाणार नाही. नोकरीत प्रगती कारक वातावरण राहील. धंद्यातील समस्या कमी करून नवे धोरण वापरता येईल. परिचयाचा उपयोग करून घेता येईल. मोठे काम मिळवा. योग्य ठिकाणी पैसा गुंतवा. शेअर्समध्ये फायदा होईल. वास्तु, दुकान, जमीन खरेदी विक्रीत लाभ मिळेल. अधुरे राहिलेले तुमचे स्वप्न पूर्ण होईल. विवाह जमेल. पुत्रप्राप्तीचा प्रयत्न करा. राजकीय-सामाजिक क्षेत्रात अधिक वेगाने कार्य पुढे नेता येईल. लोकसंग्रह वाढेल. तुमच्या कार्याचे कौतुक होईल. कला-क्रीडा साहित्यात नावलौकीक, पैसा मिळेल. नवीन परिचय वाढतील. दिग्गज लोकांच्या सहवासाने तुमच्या ज्ञानात भर पडेल. शिक्षणात उच्चप्रतीचे यश संपादन कराल. पुरस्काराने सन्मान मिळेल. कल्पनाशक्तीचा विकास करता येईल. भिडस्तपणा न ठेवता स्वतःची प्रगती करा. अधिकार मिळवा. फेब्रुवारीत दुखापत संभवते. ऑपरेशन होईल. प्रवासात सावध राहा. कोर्टाची कामे या वर्षात पूर्ण करा. जानेवारी ते मार्च, जून ते ऑगस्ट भरभराट होईल. प्रेमाला चालना मिळेल. सन्मान मिळेल. यशाचा नवा टप्पा काढता येईल. प्रयत्न चालू ठेवा.

Edit with WPS Office

# मकर

मागील वर्षात तुम्हाला मनाप्रमाणे यश मिळाले नसेल. दमछाक झाली असेल. अवमान सहन करावा लागला असेल. मकर राशीला साडेसाती सुरू आहे. 2021 मात्र सर्वच ठिकाणी तुमचे वर्चस्व वाढवणारे आहे. विरोधकांना योग्य धडा शिकवाल. प्रेमाने मैत्री कराल. मेहनत केल्यास तुमच्या यशाचा झेंडा चौफेर पसरेल. ग्रहांची साथ आहे त्याला जिद्द, प्रयत्नांची जोड द्या. म्हणजे हवे ते ध्येय पूर्ण करता येईल. कोर्ट केस यशस्वी होईल. कर्जाचे काम करून घ्या. जीवनाला कलाटणी मिळेल. विवाह पुत्रप्राप्ती सारख्या घटना होतील. वास्तू, जमीन, वाहन खरेदी विक्री फायद्याची ठरेल. नोकरीत उन्नती होईल. तुमच्या कामाचे कौतुक होईल. बेकारांना काम मिळेल. शेतकऱ्यांची निराशा संपेल. नवे धोरण यशस्वी करता येईल. कौटुंबिक वाटाघाटी चा प्रश्न मार्गी लावता येईल. राजकीय-सामाजिक क्षेत्रात नावलौकीक वाढेल. लोकांना तुमच्याबद्दल प्रेम, अभिमान वाटेल. अधिकारात वाढ होईल. अनुभवी दिग्गज लोकांचे मार्गदर्शन मिळेल. प्रभावीपणे तुमचे मुद्दे मांडता येतील. शिक्षणातील अपयश दूर सारून नवे यश संपादन करता येईल. कला-क्रीडा साहित्यात विकासाचा नवा पर्याय मिळेल. परिचय वाढतील. नवे शिकाल. चांगले, वाईट अनुभव जमा असतात तेव्हा माणूस सहसा चूक करत नाही. जानेवारी मे जून जुलै मोहात अडकून नका. जून ऑगस्ट परीक्षा कठीण असेल. फेब्रुवारी-मार्च फायदेशीर घटना घडतील. जुलैमध्ये वैर वाढेल. दौऱ्यात सावध रहा. जानेवारी ते मे मानसन्मान मिळेल. तुमच्या हिताच्या घटना घडतील.

Edit with WPS Office

# कुंभ

2021 मध्ये तुम्हाला सावधपणे निर्णय घ्यावयाचा आहे. बेकायदा कृत्य टाळावयाचे आहे. नाही तर कायद्याच्या कचाट्यात अडकून वेळ फुकट जाईल. मागील वर्षात तुम्ही जे यश मिळवले आहे त्याला टिकून ठेवणे फार महत्त्वाचे ठरणार आहे. धंद्यात सुद्धा गुंतवणूक करताना अथवा बदल करताना संपूर्ण विचार करावा. पैसा अनाठायी खर्च होईल. तुमच्या चांगल्या वर्तणुकीचा गैरफायदा घेणारी माणसे सहवासात येतील. गुपित काढून घेतील. शत्रुत्व करतील. त्यामुळेच चौफेर लक्ष ठेवा. नोकरी टिकवा. वरिष्ठांना न दुखावता मुद्देसूद चर्चा करा. इतरांच्या चुका दुरुस्त करण्यात वेळ जाईल. स्वतःचे काम नीट तपासून पहा. व्यवसायात गोड बोलून रहा. पण मोहाला फसु नका. कमी फायदा झाला तरी चालेल परंतु हातचे गमावून बसू नका. कुटुंबात जबाबदारी वाढेल. वाद-विवाद जास्त वाढवू नका. कोर्टाच्या कामात लक्ष द्यावे लागेल. पैसे देऊन काम करून घेउ हा उद्देश सफल होणे कठीण आहे. नुकसान टाळा. राजकीय-सामाजिक क्षेत्रात अभ्यासपूर्ण वक्तव्य करा. रागावर ताबा ठेवा. प्रतिष्ठा सांभाळा. विरोधक तुम्हाला कोंडीत पकडण्याचा जोरदार प्रयत्न करतील. पद सांभाळा. एप्रिल ते जुलै महत्त्वाची कामे करून घ्या. जानेवारी जुलै सप्टेंबर मध्ये तुमच्यावर आरोप येतील. टीका होईल. सहनशीलता ठेवा. कठोर शब्द टाळा. निंदकाला हिणवू नका. स्वतःत सुधारणा करा. स्वतःचे सज्जन पण टिकवून ठेवा व नम्रपणे तुमचे मत व्यक्त करा. समतोल राखा. तारेवरची कसरत करावी लागणार आहे. व्यसन नको. मार्च जून ऑगस्टमध्ये कौतुकास्पद काम कराल.

Edit with WPS Office

# मीन

तुम्ही यशाच्या मार्गावर वाटचाल करत आहात त्यामुळे त्या यशाचा विस्तार करण्याकडे ते टिकवण्या कडे लक्ष पूरवा. 2021 तुमचे स्वप्न पूर्ण करेल. तुमची प्रत्येक कृती आकर्षक होईल याकडे पहा. तुमचा आत्मविश्वास वाढेल. उत्साह वाढेल. वेळेला महत्व द्या. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रतिक्रिया व्यक्त करा. एप्रिल ते जुलै कायदा पाळा. नसत्या फंदात अडकू नका. मोहाला बळी पडू नका. पैसा सांभाळा. प्रतिष्ठा सांभाळा. नोकरीत व्याप वाढेल. इतरांच्या चुका तुमच्या माथी या कालावधीत मारल्या जातील. वर्षाच्या सुरुवातीपासून तुमच्या क्षेत्रात तुम्ही प्रगतीचा नवा मार्ग शोधाल. अधिक परिचय होईल. अनुभवी लोकांच्या कडून ज्ञानात भर पडेल. त्याचा फायदा करून घ्या. मोठी संधी मिळेल. धंद्यात वाढ होईल. वसुली करा. कुटुंबासाठी चांगली योजना पूर्ण करता येईल. जीवन साथी मुले यांना आनंदी ठेवाल. रेंगाळलेली कामे करा. विवाह मुले यांच्या प्राप्तीचा प्रयत्न करा. राजकीय-सामाजिक क्षेत्रात उन्नतीचे मार्ग दिसतील. संधीचा उपयोग करा. लोकसंग्रह वाढवा. जनतेच्या हितासाठी चांगले कार्य करा. चित्रपट कला-क्रीडा साहित्यात प्रगती कराल. पैसा मिळेल. जानेवारी मार्च मे-जून प्रतिष्ठा मिळेल. कठीण कामे करून घ्या. शिक्षणात मागे राहू नका. चांगल्या ग्रहांचा कालावधी पटकन निघून जातो. त्यामुळे मेहनत घ्या. जुलैमध्ये विरोधक मैत्री करण्यास येतील. फेब्रुवारी जुलैमध्ये विरुद्धलिंगी व्यक्ती कटकारस्थान करेल. तुम्ही तत्पर रहा. प्रगती करा.

Edit with WPS Office